**वाचले :-**

१) शासन महसूल व वनविभाग निर्णय क्र. एल-१०९५/प्र. क्र. ३८६/ई-७ दिनांक २१/११/१९९५ आणि सदर निर्णयाच्या अनुषंगाने मा. विभागीय आयुक्त, नाशिक यांचेकडील पत्र दि. ११/१२/१९९५.

२) महाराष्ट्र महसूल विभाग अव्वल कारकून (सेवा प्रवेश) नियम, १९६६.

३) महाराष्ट्र महसूल विभाग मंडळ अधिकारी (सेवा प्रवेश) नियम, १९९६.

४) शासन महसूल व वनविभाग निर्णय क्र.एसआरव्ही-१०/२००३/प्र.क्र.११९/ई-०७, दि. ०८/०९/२००३.

५) शासन महसूल व वनविभाग निर्णय क्र. संकीर्ण-१००२/ प्र. क्र. ६६/(भाग-२) ई-८, दि. २०/०३/२००६.

६) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्रमांकः बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२A/१६-ब, दि. २९ डिसेंबर, २०१७.

७) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्रमांकः एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन १२, दि. ०१ ऑगस्ट, २०१९.

८) तलाठी संवर्गातून मंडळ अधिकारी संवर्गात पदोन्नती देणेकामी दि.२८/११/२०१९ रोजी झालेल्या पदोन्नती समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.

----------------------------ooooooooooo----------------------------

क्र.आस्थाप-१/कावि/२०२०/१/१/9389
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय,
जळगाव दि. 15 /०६/२०२०

**आदेश**

तलाठी (गट-क) संवर्गातून मंडळ अधिकारी (गट-क) संवर्गात नियमित पदोन्नती देणेकामी जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव येथे दि.२८/११/२०१९ रोजी विभागीय पदोन्नती समितीची बैठक संपन्न झालेली आहे.

सदर विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीमध्ये समितीने पदोन्नतीस पात्र ठरविलेल्या तलाठी संवर्गातील कर्मचाऱ्यांना, उपोद्घातात नमुद केलेल्या शासन निर्णय व नियमांतील तरतुदी आणि निदेशानुसार, खालील अटी व शर्तीचे अधिन राहुन, **खुला प्रवर्गातुन** मंडळ अधिकारी (गट-क) संवर्गात निव्वळ तात्पुरत्या व तदर्थ स्वरूपात (On purely temporary & Ad-hoc basis) पदोन्नती देण्यात येत आहे. तसेच, सदर आदेशाद्वारे खालील तलाठी कर्मचाऱ्यांच्या नेमणुका प्रशासकीय सोईच्या दृष्टीकोनातुन अव्वल कारकून संवर्गातील व मंडळ अधिकारी संवर्गातील पदांवर परस्पर अदलाबदलीने करण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव | उपविभाग | पदोन्नतीने द्यावयाचे पदस्थापना |
|---|---|---|---|
| १ | श्री. रघुनाथ कडुबा चौधरी | जळगाव | मंडळ अधिकारी, तोंडापुर, तहसिल कार्यालय, जामनेर (श्री. मोतीराया महेंद्र दयाराम यांच्या पदोन्नतीने रिक्त झालेल्या पदावर) |
| २ | श्री. नामदेव ईच्छाराम कट्यारे | एरंडोल | मंडळ अधिकारी, अंमळगाव, तहसिल कार्यालय, अमळनेर ( श्री. पवार योगेश विश्वासराव यांच्या पदोन्नतीने रिक्त झालेल्या पदावर) |
| ३ | श्री. राजु परशुराम शेजवळ | पाचोरा | मंडळ अधिकारी, कजगाव, तहसिल कार्यालय, भडगाव (श्री. पाटील भागवत देविदास यांच्या पदोन्नतीने रिक्त झालेल्या पदावर) |

**अटी व शर्ती :-**

१. सदर कर्मचारी यांची नियमित पदोन्नती (Regular Promotion) असल्याने मा. न्यायाधिकरण / न्यायालय येथे दाखल असलेल्या न्यायप्रविष्ट प्रकरणांच्या अधिन राहून किंवा तात्पुरती ज्येष्ठता सुची इ. अन्य कारणास्तव सदर कर्मचारी यांना तात्पुरती पदोन्नती (Temporary Promotion) देण्यात येत आहे.

Scanned with CamScanner

२. सदर कर्मचाऱ्यांची पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदांवर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात, सेवा ज्येष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ मधील निर्णयाचे अधिन राहून देण्यात येत आहे. याबाबतचे निर्णय संबंधितांवर बंधनकारक राहतील.
३. मा. सर्वोच्च न्यायालयाने श्री. सभरवाल विरूध्द पंजाब सरकार प्रकरणी दिलेल्या निर्णयानुसार यात बदल संभवतो व त्याबाबत वेळोवेळी इतर जे दावे दाखल झाले आहेत. त्यातील निर्णय व श्री. व्ही. के. देशमुख व इतर सात विरूध्द महाराष्ट्र शासन याबाबत महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण मुंबई यांचेकडे दाखल केलेल्या दाव्यातील निर्णय संबंधितावर बंधनकारक राहतील.
४. शासन सामान्य प्रशासन विभागाकडील पत्र क्र. बीसीसी-२००१/१८८७/प्र. क्र. ६४/०१/१६-ब, दि. ०१/०४/२००८ अन्वये, वि.जा.भ.ज. व वि.मा.प्र. या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना देण्यात येणारी पदोन्नती ही मा. ना. उच्च न्यायालयात दाखल असलेल्या मुख्य याचिका क्र. ८४५२/२००४ च्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून देण्यात येत आहे. याबाबतचे निर्णय संबंधितांवर बंधनकारक राहतील.
५. श्री. एस. डी. सोनार व इतर यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे दाखल केलेल्या याचिका क्रमांक ९५२/९५ मधील अंतिम निर्णय संबंधितावर बंधनकारक राहतील.
६. सदर कर्मचाऱ्यांना मंडळ अधिकारी संवर्गात देण्यात आलेली पदोन्नती ही तदर्थ व निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात देण्यात येत असून जिल्हाधिकारी जळगांव यांच्या आस्थापनेवरील मंडळ अधिकारी (गट-क) संवर्गातील पदे कमी / व्यपगत झाल्यास त्यांना ज्येष्ठतेनुसार पदावनत करण्यात येईल, या अटीवर देण्यात आहे.
७. पदोन्नतीचे पदावर एक महिन्याचे मुदतीत रूजु होणे आवश्यक आहे. संबंधितांना पुर्वीच्या पदावरुन कार्यमुक्त केल्यानंतर म. ना. से. (ज्येष्ठतेचे विनियमन) नियम, १९८२ मधील तरतुदीनुसार विहित मुदतीत रूजु न होणारे कर्मचारी म. ना. से (शिस्त व अपील), नियम, १९७९ मधील तरतुदीनुसार शिस्तभंगाचे कारवाईस पात्र ठरतील. तसेच त्यांनी पदोन्नती नाकारली आहे असे समजून त्यांचे विरुध्द योग्य ती कारवाई करण्यात येईल. आणि त्यांची सेवा ज्येष्ठता डावलण्यात येऊन त्यांना तळाची ज्येष्ठता देण्यात येईल.
८. संबंधीत कार्यालय प्रमुखांनी वर नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त करून पदोन्नतीच्या नवीन पदावर तात्काळ हजर होणाच्या सुचना देण्यात याव्यात.
९. पदोन्नती झालेल्या कर्मचाऱ्यांपैकी कोणत्याही कर्मचाऱ्याने पदोन्नती रद्द करणे, पदस्थापनेत बदल करणे किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव बाह्य दबाव आणल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९७९ मधील नियम २३ मधील तरतुदींचा भंग केला म्हणून त्यांचे विरूध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ नुसार प्रशासकीय / शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल यांची संबंधीत कार्यालय प्रमुख / शाखाप्रमुख यांनी त्यांना जाणीव करून द्यावी.
१०. सदरचे आदेश निर्गमित केल्याचे दिनांकापासून तात्काळ अंमलात येतील.

COLLECTOR JALGAON जिल्हाधिकारी जळगाव

**स्वाक्षरीत**
**(डॉ. अविनाश ढाकणे)**
**जिल्हाधिकारी जळगाव**

**प्रत** :- मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांनी सविनय सादर.
**प्रत** :- उपविभागीय अधिकारी, ------------------------------/ तहसिलदार-----------
**प्रत** :- संबंधित कर्मचारी.

**(राहुल पाटील)**
**निवासी उपजिल्हाधिकारी**
**जिल्हाधिकारी कार्याल, जळगाव**

Scanned with CamScanner